# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : विधानसभा सदस्य अनुपस्थितीबाबतचा प्रस्ताव**

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक (१) व (२))**

(१) **श्री. अशोक चव्हाण, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सर्वसामान्य जनतेला प्रवासाच्या सोयीसाठी उभारण्यात आलेल्या राज्यातील सध्या अस्तित्वात असलेल्या १८ विमानतळांपैकी सद्य:स्थितीत केवळ सातच विमानतळ विमान प्रवाशांसाठी उपलब्ध असणे, आंतरराष्ट्रीयदृष्ट्या महत्वाच्या असलेल्या मुंबई विमानतळावरुन राज्यातील नागपूर, औरंगाबाद, सिंधदुर्ग आणि कोल्हापूर वगळता इतर कोणत्याही शहरामध्ये जाण्यासाठी विमानसेवा उपलब्ध नसणे, मात्र याच मुंबई विमानतळावरुन शेजारच्या गुजरात राज्यातील अहमदाबादकरीता १७, राजकोट करिता ३, तर वडोदरासाठी २ उड्डाणे उपलब्ध असणे, परंतु महाराष्ट्र राज्यात विमानतळ उपलब्ध असूनही विमान सेवा उपलब्ध नसणे, राज्यातील बहुतांश विमानतळांवर रात्री विमाने उतरविण्याची सोय नसणे, आणीबाणीच्या प्रसंगी अत्यावश्यक म्हणून सुरक्षा व्यवस्था तसेच एअर ऍंब्युलन्स सेवांसाठी २४ तास विमानतळ सज्ज ठेवणे अपेक्षित असणे, आजच्या युगात विमान प्रवास ही केवळ चैनीची गोष्ट राहीली नसून वेळ वाचविण्याकरीता उद्योजकांबरोबरच सर्वसामान्य प्रवाशांकडून विमान प्रवासाचा पर्याय निवडला जाणे, मात्र, मराठवाडयामध्ये औरंगाबाद वगळता अन्य कोणत्याही जिल्ह्यात विमानतळ नसणे, राज्यातील विमानसेवा उपलब्ध नसलेले बहुतांश विमानतळ वापराअभावी दुर्लक्षित / ना-दुरुस्त असणे सध्या नांदेड-बारामती-लातुर-उस्मानाबाद ही विमानतळ रिलायन्स लिमिटेड या कंपनीला दिलेली असणे, मात्र सदर कंपनीने आर्थिक दिवाळखोरी जाहीर केल्यामुळे व कंपनी विमानतळाची सेवा, देखभाल व दुरुस्ती करण्यास असमर्थ असल्यामुळे सध्या बंद असलेली विमानसेवा तात्काळ नव्याने सुरु करण्यासाठी निविदा काढून नविन कंपनीची नियुक्ती करण्याची आवश्यकता असणे,

अप्रकाशित प्रत

सध्याच्या गतीमान काळात राज्यातील जास्तीत जास्त शहरे विमान सेवेने एकमेकांना जोडण्याची आवश्यकता असणे, मात्र शासनाच्या उदासिनतेमुळे राज्यातील शहरांना जोडणारी विमान सेवा उपलब्ध  नसल्यामुळे राज्यातील नागरिकांना १२ ते १४ तासांचा शारिरीक व मानसिक दृष्ट्या थकविणारा प्रवास करुन दुसऱ्या शहरांपर्यंत जावे लागणे, मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहरामधून अन्य राज्यातील प्रवाशांकरिता मोठ्या प्रमाणावर विमानसेवा उपलब्ध असणे, मात्र, राज्यातील नागरिकांनाच अशी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे राज्यातील उद्योजक, व्यावसायीक तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजी यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भुमिका."

**(२) सर्वश्री. रवींद्र धंगेकर, संजय जगताप, बाळासाहेब थोरात, नाना पटोले, अमीन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री. संग्राम थोपटे, सुनिल केदार, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री. बळवंत वानखडे, कुणाल पाटील, कु.प्रणिती शिंदे, डॉ.विश्वजित कदम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील निवासी इमारतीमधील ५०० चौ. फूटपर्यंत चटईक्षेत्र असलेल्या सदनिकांना मालमत्ता कर संपूर्णपणे माफ करण्याचा निर्णय तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी सन २०२१ मध्ये घेतलेला असणे, या धर्तीवरच नवी मुंबई महानगरपालिकेतील ५०० चौ.फूट पर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफ करण्यासाठी महानगरपालिकेला शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचे आदेश माहे जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिले असणे, यामुळे या पालिकेच्या हद्दीतील १ लाख ९८ हजार सदनिकाधारकांना याचा फायदा होणार असणे, याचप्रमाणे पुणे शहरात मोठया प्रमाणात सर्वसामान्य नोकरदार व मध्यमवर्गीय वर्ग ५०० चौ.फूट अथवा त्यापेक्षा कमी जागेत राहत असून त्यांना मालमत्ता कर भरणे अत्यंत जिकीरीचे होत असणे,  मुंबईच्या धर्तीवर पुणे महानगर क्षेत्रातील ५०० चौ.फूट किंवा त्यापेक्षा कमी जागेत असलेल्या सदनिकांना मालमत्ता करातून मुक्त करण्यात यावे, म्हणून माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींने शासनाला निवेदन देऊन मागणी केलेली असणे, परंतु या निवेदनावर शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, यामुळे पुणे शहरातील जनतेमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, जनतेला न्याय मिळण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घेऊन पुणे शहरात ५०० चौ.फूटांपर्यंत घरांना संपूर्ण कर माफ करण्यासाठी शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री.महेश लांडगे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून घनकचऱ्याची हाताळणी व व्यवस्थापन करण्यासाठी शहरातील सर्व मालमत्ताधारकांकडून उपयोगकर्ता शुल्काची आकारणी

राज्य शासनाच्या नगरविकास विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१९ रोजीच्या अधिसूचनेप्रमाणे करण्यात येणे, त्यायोगे शहरातील प्रतिमालमत्ता ६० रुपये प्रतिमहा अशा वार्षिक रु.७२०/- उपयोगकर्ता शुल्क व दंड वसुली महापालिका प्रशासनाव्दारे चार वर्षाच्या अक्षम्य दिरंगाईने सर्वसामान्यांकडून वसुल करण्यात येत असणे, परिणामी महापालिकेच्या सदरच्या कारवाईमुळे व्यथित होऊन स्थानिक नागरिकांकडून सदरच्या वसुलीस दिवसेंदिवस होत असलेला प्रचंड विरोध व सामान्य नागरिकात शासनाविरोधात वाढत असलेला असंतोष, याबाबत राज्य शासनाने सदरचा उपयोगकर्ता शुल्क व दंड वसुली बंद करून शहरवासियांकडून महापालिकेने वसूल करण्यात आलेला जबरी उपयोगकर्ता कर व दंड हा शहरवासियांच्या मिळकत करामध्ये समायोजित करण्याची होत असलेली मागणी विचारात घेऊन याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्रीमती यामिनी जाधव, डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील मोहम्मद अली रोड येथील “नूर” या खाजगी धर्मादाय रुग्णालयात दिनांक ८ जुलै, २०२३ रोजी श्रीमती प्रज्ञा रोहन केदारे-लोखंडे या गर्भवती महिलेची प्रसुती होणे, दिनांक ९ जुलै, २०२३ रोजी रात्री २.०० वाजता डॉ.मासूमा हुसेन मर्चंट यांनी तिची सिझेरिअन पध्दतीने प्रसुती करणे, प्रसुतीनंतर श्रीमती प्रज्ञा व तिचे बाळ या दोघांची प्रकृती उत्तम असल्याचे डॉक्टरांनी कळविणे, श्रीमती प्रज्ञा यांना सकाळी ६.०० च्या सुमारास मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होणे, याबाबत तेथील डॉक्टरांना वारंवार कल्पना देऊनही डॉ. मासूमा मर्चंट या श्रीमती प्रज्ञा यांची तपासणी करण्यासाठी हजर न होणे, त्यानंतर सकाळी ९.०० वा डॉ. मासूमा हुसेन मर्चंट यांनी नूर रुग्णालयात फोन करणे व तेथे कर्तव्यावर असलेल्या नर्सला सांगून श्रीमती प्रज्ञा हीला काही औषधे व इंजेक्शन देण्याबाबत सांगण्यात येणे, श्रीमती प्रज्ञा यांची तपासणीकरीता तसेच औषधे देण्यास रुग्णालयाकडून उशीर होणे व मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होणे, नूर रुग्णालयातील डॉक्टरांनी श्रीमती प्रज्ञा हीच्यावर वेळीच उपचार न केल्याने तसेच डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे तिचा दुर्दैवी मृत्यू होणे, रुग्णालयातील प्रशासन मात्र सदरील घटनेबाबत मृत्युची जबाबदारी झटकत असणे, यापूर्वीदेखील नूर रुग्णालयामध्ये अशा प्रकारच्या घटना घडलेल्या असणे व अनेक पिडीतांना न्याय मिळालेला नसणे तसेच शासनाने अद्यापपर्यंत याबाबत कोणतीच कारवाई केली नसल्याचे निदर्शनास येणे, स्थानिक पायधुनी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंदविण्यास देखील तेथील पोलीस अधिकारी / कर्मचारी टाळाटाळ करीत असल्याची बाब उघडकीस येणे, त्यामुळे श्रीमती प्रज्ञा हिच्या कुटूंबियांमध्ये व स्थानिक रहीवाशी यांच्यामध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, सदर रुग्णाालयाबाबत वारंवार तक्रार करुन देखील शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करुन शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

अग्रिम प्रत

**(५) श्री.दादाराव केचे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती जिल्ह्यातील अप्पर वर्धा प्रकल्प व वर्धा जिल्ह्यातील लोअर वर्धा प्रकल्प गेल्या १२ ते १५ वर्षापासून पूर्ण झालेला असणे, हे दोन्ही प्रकल्प पावसाळ्यामध्ये १०० टक्के क्षमतेने भरल्यानंतर प्रकल्पाच्या गेट मधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विर्सग होत असणे, या दोन्ही प्रकल्पाचे पाणी वर्धा नदी पात्रात सोडण्यात येणे, त्यामुळे नदी पात्रलगत असलेली अमरावती जिल्ह्यातील सिंभोरा, येवती, भांबोरा व वर्धा जिल्ह्यातील बेल्होरा, खंबित, गोदावरी, टेकोडा ता.आष्टी व आर्वी तालुक्यातील रोहना, दह्यापुर, सायखेडा अशा अनेक गावातील शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात पाण्याने नुकसान होणे, तसेच लोअर वर्धा प्रकल्प १०० टक्के क्षमतेने भरल्यानंतर प्रकल्पाचे बॅक वाटर राजापूर, देवूरवाडा, निंबोली येथील शेतकऱ्यांच्या शेतात पाणी जमा होणे व येथील लोक वस्तीस असलेल्या नागरीकांच्या घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, त्यामुळे शेतकऱ्यांना व नागरिकांना १२ ते १५ वर्षांपासून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सहन करावे लागणे, शेतकऱ्यांना झालेल्या पिकांची नुकसान भरपाई देवून नुकसानग्रस्त शेती अधिग्रहित करुन नदी किनाऱ्यावरील नागरिकांच्या घराचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) सर्वश्री. रईस शेख, अबू आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र शासनामार्फत व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (MSEDCL) मार्फत वीज वितरणात सुधारणा घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू असणे, महाराष्ट्र शासनामार्फत भिवंडी शहरात दिनांक २६ जानेवारी, २००७ पासून "टोरंट पॉवर लिमिटेड" ही कंपनी भिवंडी परिमंडळात महावितरणची वितरण फ्रँचायझी म्हणून कार्यरत असणे, मागील पंधरा वर्षाच्या कालावधीत भिवंडी शहर हे महाराष्ट्रामध्ये वीजबील देयक भरण्याची कामगिरी करणारे राज्यातील एक सर्वोत्कृष्ट शहर असणे, मात्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (MSEDCL) मार्फत वीज दर वाढ केल्यामुळे सर्वसामान्य वीज ग्राहकांना त्याचा त्रास होत असून पावरलूम उद्योगांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान होत असणे, तसेच सदर कंपनी वीज ग्राहकांकडून दोन महिन्यांची अतिरिक्त ठेव जमा करून घेत असणे, सदर कंपनीमार्फत मोठ्या प्रमाणात बनावट व्हिजीलंस केसेस वाढत असणे, वीज ग्राहकांना होत असलेल्या त्रासाबद्दल सदर कंपनीविरुद्ध तक्रार करण्यासाठी भिवंडी शहरात कोणतीही व्यवस्था अथवा नोडल अधिकारी नसणे, सदर कंपनीमार्फत अपुरा वीज पुरवठा होत असल्यामुळे वीज वारंवार खंडीत होत असणे, राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री यांच्या सोबत दिनांक १४ डिसेंबर, २०२१ रोजी "वीज ग्राहकांच्या समस्या व जुन्या थकबाकीवर व्याज आकारणी" या विषयावर बैठक आयोजित करण्यात आलेली असणे, भिवंडीतील अनेक ग्राहकांकडे महावितरणची जुनी थकबाकी असून व्याज माफ केल्यास भिवंडीकर

अग्रिम प्रत

हफ्त्या हफ्त्यामध्ये रक्कम भरण्यास तयार असणे, भिवंडी शहरासारखेच शिळ-मुंब्रा-कळवा या ठिकाणी वीज वितरण करणेकामी सदर प्रायव्हेट कंपनी फ्रँचायझी म्हणून कार्यरत असणे, शिळ-मुंब्रा-कळवा येथे जो करार झाला आहे त्याअनुषंगाने मूळ रकमेच्या ११०% रक्कम एकाच वेळी भरण्याचा आणि संपूर्ण व्याज माफी मिळवण्याचा पर्याय व पी डी ग्राहकांसाठी आधीच संपूर्ण व्याज माफी योजना अस्तित्वात असणे, परंतु भिवंडीमध्ये सदर योजनेत ५०% रकमेचा पर्याय असून हा फरक काढण्याची मागणी होत असून भिवंडीतील ग्राहकांना महावितरणच्या जुन्या थकबाकीसाठी समान पर्याय उपलब्ध करून देत शिळ-मुंब्रा-कळवाच्या धर्तीवर योजना थेट ग्राहकांसाठी उपलब्ध करून देणे, सद्यस्थितीत भिवंडी क्षेत्रात ३३००० महावितरणाचे ग्राहक असून महावितरणची जुनी थकबाकी सुमारे ५०० कोटी असणे, तसेच थकबाकींवरील व्याज वर्षानुवर्षे वाढत असल्याने महावितरणची थकबाकी सतत वाढणे, त्याअनुषंगाने "अमृत योजना" नावाची योजना सुरू करण्याचा प्रस्ताव मा.उप मुख्यमंत्री यांस दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली असणे, तसेच अनेक वेळा सभागृहातही मागणी करणे, (MSEDCL) च्या रखडलेल्या महसुलात (कर आणि शुल्क) लक्षणीय वाढ होण्याच्या दृष्टीने याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना.”

**(७) ॲड.आशिष शेलार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

" मुंबई शहरामध्ये अनेक झोपडपट्टी पुनर्वसन योजना या मागील १५ ते २० वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून प्रलंबित असून या झोपडपट्टी संस्थेतील झोपड्यांचा पुनर्विकास झाला नसल्याने सदरच्या झोपड्या आजही जागेवर असणे, तसेच या झोपड्यांचे परिशिष्ट-२ ही त्यावेळेस बनवलेले असल्यामुळे यातील अनेक झोपडीधारकांचा दरम्यानच्या कालावधीमध्ये मृत्यू झालेला असुन यातील अनेक झोपडीधारकांनी त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव आपल्या झोपड्यांचा खरेदी-विक्रीचा व्यवहार करुन त्यांचे हस्तांतरण ही झालेले असणे, मात्र त्यांची शासनाच्या दिनांक ११ जुलै, २००१ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार झोपडीच्या हस्तांतरणास निर्बंध असल्याने परिशिष्ट-२ मध्ये नाव असलेल्या पात्र व अपात्र झोपडीधारकांकडून झोपडीचे खरेदी-विक्री वारसाद्वारे हस्तांतरण झाले असले तरी देखील त्यांची नव्याने पात्रता करण्याची तरतूद नसणे, म्हणजे संस्था व झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे अंतिम परिशिष्ट-२ पारित केल्यानंतर परिशिष्ट-२ मधील नावात बदल करता येत नसणे, याचबरोबर एखाद्या एसआरए संस्थेचे अंतिम परिशिष्ट-२ निर्गमित झाल्यानंतर परिशिष्ट-२ मधील एखाद्या पात्र अथवा अपात्र झोपडीधारकाने त्याच्या झोपडीचे हस्तांतर केल्यास विकत घेणाऱ्या झोपडीधारकाचे नाव मूळ परिशिष्ट-२ मधील झोपडीधारकाच्या नावाच्या जागी येण्याकरीता प्रचलित नियमांमध्ये कोणतीही तरतूद नसणे, त्यामुळे झोपडपट्टी गृहनिर्माण संस्थेचे अंतिम परिशिष्ट-२ निर्गमित झाले असेल व अशा अंतिम परिशिष्ट-२ मधील एखाद्या झोपडीधारकाने त्यांच्या झोपडीचे अन्य व्यक्तीस हस्तांतर केले असल्यास

झोपडी विकत घेणाऱ्या व्यक्तीवर अन्याय होऊ नये म्हणून सदर व्यक्तीचे नाव सदर संस्थेच्या परिशिष्ट-२ मध्ये झोपडी विकणाऱ्या झोपडीधारकाऐवजी येण्याकरीता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) कॅप्टन तमिल सेल्वन, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील सायन कोळीवाडा विभागात ७५% पेक्षा अधिक क्षेत्र हे झोपडपट्टीने व्यापलेले असून यामध्ये बहुतांश झोपडपट्ट्यांचे झोपडपट्टी पुनर्विकास करण्यासाठीचे प्रकल्प मागील १५ ते २० वर्षांपासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास येणे, सदर विभागात विकासकांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प हाती घेऊन झोपड्याचे निष्कासन करण्यात येणे, सदर प्रकल्प सुरु करण्यापूर्वी स्थानिकांना राहण्याकरिता पर्यायी व्यवस्था उपलब्ध करण्यात न येणे, महिनोंमहिने प्रकल्प अपूर्ण असताना घर भाडे देण्यात न येणे, झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प एखाद्या विकासकाला राबविण्यास देण्यापूर्वी विकासकाचा पूर्वइतिहास न तपासता प्रकल्पास प्रशासनाकडून मंजुरी (LOI) देण्यात येणे, ब्लॅकलिस्टेड विकासकाला पूर्वीचा प्रकल्प १००% पूर्ण केल्या वाचून नवीन प्रकल्प पुनर्वसनाकरिता दिले असता भविष्यात सदर विकासकाकडून पुन्हा जनतेची फसवणूक केल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबईतील एसआरए प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने विकासकांना वेळ मर्यादा आखून देण्याची नितांत आवश्यकता, दिलेल्या वेळेत काम पूर्ण न करणाऱ्या विकासकांवर कारवाई करण्यासाठी सदरच्या कायद्यात त्याबाबतची तरतूद करण्यासाठी शासनाने भूमिका घेण्याची आवश्यकता, एखादा प्रकल्प विकासकाला विकासकाम करण्यासाठी दिला असता तो सुरु करण्याचे व वेळेत पूर्ण करण्याचे बंधनकारक करण्याची आवश्यकता असणे, एखादा प्रकल्प विशिष्ट विकासकाला विकासकाम करण्याकरिता दिला असता तो पूर्ण करणे व सर्व अटी व शर्तींची पूर्तता केल्याशिवाय अन्य विकासकाला विकासकाम करण्याकरिता सदर प्रकल्प हस्तांतरीत करण्याबाबत कठोर नियमांची आवश्यकता, सर्व अटी व शर्तीची पूर्तता न झाल्यास हस्तांतर करू देण्यास मनार्दची आवश्यकता, सायन कोळीवाडा विभागातील डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर, कोकरी आगार, अँटॉपहील सीएस नं ६, १०, ११, २६, ७७ येथे श्री गणेश को ऑप हौसिंग सोसायटी व डॉ बाबासाहेब आंबेडकर को ऑप हौसिंग सोसायटी यामध्ये अंदाजे १५० व ६०० झोपडीधारक वास्तव्यास असणे, सदर ठिकाणी असलेल्या विकासकाने स्थानिक नागरिकांवर जबरदस्ती करून / दमदाटीने सर्व्हे करून त्यांची मान्यता घेत असल्याचे निदर्शनास येणे, या विकासकाने मुंबईत उभारलेल्या एसआरए प्रकल्पात मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून येत असणे, यामुळे बहुतांश ठिकाणच्या प्रकल्पांना एसआरए मार्फत स्थगिती देण्यात आली असणे, असे असतानाही सदर विकासकाच्या नवीन प्रकल्पांना मंजुरी दिली जात असल्याची बाब समोर येणे, सायन कोळीवाडा विभागातील शांती नगर झोपडपट्टी सीएस प्लॉट नं ६ आणि १४४ वडाळा (पूर्व) येथील विकासकाद्वारे स्थानिक पुढाऱ्यांच्या

मदतीने रहिवाश्यांना धमकावून जबरदस्तीने करारनाम्यावर स्वाक्षरी घेण्यात येणे, सदर विकासक व विकास प्रकल्प यांस स्थानिक नागरिकांकडून प्रखर विरोध करण्यात येणे, परिणामी विभागातील रहिवाश्यांमध्ये प्रशासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, सायन कोळीवाडा विभागातील रखडलेले पुनर्विकास प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करून रस्त्यावर आलेल्या झोपडीधारकांना हक्काची घरे मिळवून देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(९) श्री.अभिमन्यु पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र दारुबंदी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी तसेच दोषसिध्दीच्या प्रमाणामध्ये सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी शासनाकडून कार्यवाही होत आलेली असणे, परंतु महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचा विचार करता दरवर्षी महाराष्ट्रामध्ये सरासरी १ लक्ष गुन्हे दाखल होत असून फक्त नागपूर परिक्षेत्राचा विचार करता सरासरी २४,००० गुन्हे दाखल होत असणे, या कायद्यामध्ये दोषसिद्धीचे प्रमाण लक्षात घेता १ % पेक्षा कमी असणे, महाराष्ट्र दारुबंदी कायद्याखाली दाखल झालेल्या प्रत्येक सौम्य / गंभीर गुन्हयामध्ये एफ.आय.आर., पंचनामा, मुद्देमाल जप्ती, FSLरिपोर्ट प्राप्त करणे व गुन्हयांचे सविस्तर तपास करुन न्यायालयामध्ये दोषारोप घटनास्थळ पत्र सादर करावे लागत असणे, त्याचबरोबर न्यायालयाकडून प्रत्येक गुन्हयाचा निपटारा करण्यात येत असणे, गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास करण्याकरीता काही दिवस ते काही महिन्यांचा कालावधी लागत असणे, न्यायालयांमध्ये सदर गुन्हयाची केस चालविण्यासाठी काही महिन्यांचा कालावधी लागत असणे, त्याचबरोबर केसची न्यायालयीन सुनावणी होऊन निकाल लागेपावेतो काही महिन्यांचा कालावधी लागणे, या संपूर्ण प्रकियेदरम्यान जप्त केलेला मुद्देमाल पोलीस स्टेशनमध्ये जमा असणे, या प्रकियेकरीता बराच कालावधी जात असून सुध्दा विविध कारणास्तव गुन्हे शाबीतीचे प्रमाण ०.५ % याप्रमाणे अल्प असणे, यावरुन प्रचलित कार्यपध्दतीद्वारे करण्यात येणारी कार्यवाही प्रभावी ठरत नसल्याचे दिसुन येत असणे, या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यामध्ये अपराध हे कोणतीही जोखीम न पत्करता उच्च लाभ मिळविण्याचे झालेले असल्याने अडचणी निर्माण होत असणे, त्याचप्रमाणे मोठ्या संख्येमध्ये दाखल होणाऱ्या दारुबंदी गुन्ह्यांमुळे गंभीर गुन्ह्यांच्या तपासाच्या व अभियोग चालविण्याच्या गुणवत्तेवर परिणाम होत असणे, महाराष्ट्र दारुबंदी कायदा हा एक सामाजिक कायदा असून जेव्हा संघटीत गुन्हेगारी टोळया करुन मोठ्या प्रमाणात दारुची निर्मीती, विक्री, वाहतूक व तस्करी संघटीतरित्या केली जाते, तेव्हा त्यांचेविरुध्द कठोरपणे कारवाई करणे गरजेचे असणे, त्याचबरोबर अशा गुन्ह्यांचे गांभिर्यपूर्वक व गुणात्मक तपास करुन गुन्हेगारांना कडक शिक्षा होणे आवश्यक असणे, तथा लहान गुन्हयाकरीता एफ.आय.आर. दाखल करणे, तपास करणे, दोषारोपपत्र न्यायालयात पाठविणे व खटला चालविणे याकरीता लागणारे मनुष्यबळ कमी करुन गुन्हे शाबीतीचे प्रमाण कमीतकमी ६० % ते ८० % नी वाढविणे,

अग्रिम प्रत

शिक्षेच्या सुनिश्चीतीची खात्री करणे, लोकांना दारूबंदी कायद्याचे तरतुदीचे उल्लंघन करण्यापासून थांबविण्यासाठी महाराष्ट्र दारुबंदी कायद्यात सुधारणा करणे आवश्यक असणे, दारुबंदी कायद्याखालील अपराध हे केवळ कमी जोखीमेचे व उच्च लाभ मिळविण्याकरीता न राहता कोणतेही जोखिम न पत्करता फक्त लाभ मिळविण्याचे झालेले असणे, ज्यामुळे, गुन्हेगारांमध्ये शिक्षा होण्याचा धाक नाहीसा झाल्याने दिवसेंदिवस त्यांचे धाडस वाढत असणे, त्यामुळेच, दारूबंदी कायद्यामधील तरतूदींचे योग्य आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षेच्या सुनिश्चीततेची खात्री करणे आणि या कायद्याचे तरतूदींमध्ये सुधारणा करणे सद्यस्थितीचा विचार करता अधिक महत्वाचे झालेले असणे, दारुबंदी कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करून दारूबंदी कायद्याखाली दाखल गुन्ह्यांत अभियोगांच्या प्रक्रियेमध्ये सुलभता आणणे, गंभीर / गुणात्मक आणि किरकोळ / लहान प्रकरणांमध्ये भेद करणे तसेच किरकोळ / लहान प्रकरणाकरीता अभियोगाची क्रियारिति सुकर करणे, उपलब्ध माहितीच्या आधारावर विश्लेषण करुन पोलीस, अभियोजन पक्ष व न्यायालय या संस्थेवरील कामाचा भार कमी करणे या आणि इतर सुधारणा करणे गरजेचे असणे, तसेच सामाजिकदृष्ट्या विचार करता राज्यातील प्रत्येक गावातील अनेक कुटुंब दारूच्या वाढते प्रमाण व गैर प्रसार यामुळे उधवस्त झाली असून गावातील महिलांचा दारूबंदी व दारूच्या वाढत्या प्रसाराला नेहमीच विरोध राहिला असणे, याद्दष्टीने शासनाने तातडीने महाराष्ट्र दारुबंदी कायदा-१९४९ ची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**पाच : शासकीय विधेयके :**

**विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) (क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, संजय जगताप, सुरेश वरपुडकर, अमीन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, संग्राम थोपटे, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री बळवंत वानखडे, सुभाष धोटे, शिरीष चौधरी, कुणाल पाटील, मोहनराव हंबर्डे, रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ - महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा अध्यादेश, २०२३ नापसंत करते."

**(ख) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, नाना पटोले, संजय जगताप, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, शिरीष चौधरी व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, संजय जगताप, सुरेश वरपुडकर, अमिन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, संग्राम थोपटे, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री बळवंत वानखडे, सुभाष धोटे, शिरीष चौधरी, कुणाल पाटील, मोहनराव हंबर्डे, रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ - महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे अध्यादेश, २०२३ नापसंत करते."

अप्रकाशित प्रत

**(ख) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, नाना पटोले, संजय जगताप, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, शिरीष चौधरी व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ – महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३**

अमुद्रित प्रत

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ – महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमीन पटेल, विकास ठाकरे, सुभाष धोटे, जितेश अंतापूरकर, शिरीष चौधरी, संजय जगताप, नाना पटोले, अमित झनक व बळवंत वानखडे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ – महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ – महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ – महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

-----------------------------------------------------------------------------------------------

अग्रिम प्रत

**(गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सहा : म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

**सर्वश्री बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, अजय चौधरी, अशोकराव चव्हाण, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री सुनिल प्रभू, नाना पटोले, राजेश टोपे, पृथ्वीराज चव्हाण, रविंद्र वायकर, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री प्राजक्त तनपुरे, राजन साळवी, विजय वडेट्टीवार, अनिल देशमुख, सुनिल राऊत, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, सुनिल केदार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, वैभव नाईक, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संजय पोतनीस, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री रमेश कोरगावकर, अमिन पटेल, कैलास घाडगे-पाटील, अमित देशमुख, नितीन देशमुख, सुरेश वरपुडकर, उदयसिंग राजपूत, रणजीत कांबळे, श्रीमती ऋतुजा लटके, श्री.संग्राम थोपटे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री कैलास गौरंट्याल, अमित झनक, कुणाल पाटील, शिरीष चौधरी, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सुभाष धोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, पी.एन. सडोलीकर-पाटील, डॉ.विश्वजीत कदम, सर्वश्री शिरीषकुमार नाईक, राजेश एकडे, बळवंत वानखडे, राजू पारवे, विकास ठाकरे, सहसराम कोरोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, हिरामण खोसकर, झिशान सिध्दीकी, संजय जगताप, लहु कानडे, धीरज देशमुख, ऋतुराज पाटील, राजू आवळे, विक्रमसिंह सावंत, जितेश अंतापूरकर, श्रीमती जयश्री जाधव, श्री.रविंद्र धंगेकर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात सातत्याने होणारा खातेबदल, कामाच्या विभागांकडे मंत्र्यांचे होत असलेले दुर्लक्ष, एकाच मंत्र्याकडे एकाहून अधिक जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी असणे, त्या माध्यमातून राज्याच्या विकासाला खीळ बसणे, राज्यात शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय असणे, शासनाने विधानसभेत स्पष्ट आश्वासन देऊनही राज्यातील हजारो शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर रकमेचा लाभ न मिळणे, बोगस बी-बियाणे व खते विक्रीचे रॅकेट कार्यरत असूनही त्यावर गांभीर्याने कारवाई न होणे. राज्यातील नदी-नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण व साखळी बंधाऱ्यांची कामे घेण्याची आवश्यकता, क्षतिग्रस्त तलावांसह सध्या कार्यान्वित असलेले सिंचन प्रकल्प निधीअभावी रखडणे, "शासन आपल्या दारी" उपक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन सुविधा ऑफलाईन देऊन त्याला राजकीय स्वरुप देणे, जनतेस त्याचा काहीही फायदा न होणे व कार्यक्रमाची जाहिरात व अंमलबजावणीसाठी अब्जावधी रुपयांचा वारेमाप खर्च होणे, तत्कालीन विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी महाराज नगर (औरंगाबाद) यांनी शेतकऱ्यांना सहाय्यभूत अनेक शिफारशी करणे, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत नाराजीची भावना निर्माण होऊन त्यांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेणे, मागील सरकारने मंजूर केलेल्या समृद्धी महामार्गाचाच भाग असलेल्या जालना नांदेड महामार्गचे काम कुर्मगतीने सुरु असणे, जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना भूसंपादनाचा योग्य

मोबदला न मिळणे, नांदेड-लातूर रेल्वे मार्गाचा प्रस्ताव अद्यापही तयार न होणे, मराठवाड्यामध्ये बूलेट ट्रेन प्रकल्प आणण्याकरिता शासन उदासीन असणे, हिंगोली सारख्या "ना उद्योग" भागातील सहकारी साखर कारखान्यांना पॅकेज स्कीम इन्सेंटिव अंतर्गत मिळणाऱ्या सवलती काढून घेणे, विमानतळांचा विकास व अद्यावतीकरणाबाबत शासन उदासीन असणे, राज्यभर विमानतळे उपलब्ध असूनही निवडक शहरे वगळता इतरत्र विमानसेवा सुरू नसणे, मनमाड औरंगाबाद परभणी रेल्वेच्या दुपदरीकरणास सुरुवातही न होणे, नाशिक-पुणे रेल्वेमार्गाचे काम खोळंबणे मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, पाण्याच्या उपलब्धतेचा विचार न करता घाईगडबडीने वॉटर ग्रीडची संकल्पना राबविणे, बाभळी धरणातून वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी तेलंगणा राज्याच्या सहमतीने सर्वोच्च न्यायालयाकडे संदर्भ न करणे, पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याची आवश्यकता असणे, शासकीय रुग्णालये व महाविद्यालयांची झालेली दुरवस्था वैद्यकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची पदे न भरल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय, एसईबीसी मधून ईडब्ल्यूएसचा विकल्प दिलेल्या मराठा उमेदवारांच्या नियुक्तीचे प्रकरण उर्जा विभागाकडे मागील दोन महिन्यांपासून प्रलंबित असणे, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, मराठा व इतर आरक्षणाच्या संदर्भात प्रचंड मोर्चे, उपोषणे, आत्महत्या करुनही या बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, शासनाच्या विविध विभागातील पद भरती करीता आयोजित करण्यात येत असलेल्या परिक्षांचे शुल्क अत्यंत जास्त असल्याने गरीब कुटुंबातील परिक्षार्थीना शुल्क भरण्यात अडचणी येणे, केवायसीच्या नावाखाली अतिवृष्टी व पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अनुदान न मिळणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, राज्याची ढासळलेली अर्थव्यवस्था, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामासाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेली खीळ, महाविकास आघाडी सरकारच्या काळातील कामांना दिलेली स्थगिती अद्यापही न उठविल्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

## अशासकीय कामकाज

## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**सात : अशासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ :**

**(१)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२१- **श्री. संजय सावकारे**, **वि.स.स. यांचे.**

**(२)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र राज्यातील बेरोजगार युवक-युवतींना बेरोजगार भत्ता विधेयक,२०२१ - **श्री.प्रकाश आबिटकर**, **वि.स.स. यांचे.**

**(३)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२१ - **श्री. सुहास (आण्णा) कांदे**, **वि.स.स. यांचे.**

**(४)** सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२२ - **श्री. संजय सावकारे**, **वि.स.स. यांचे.**

**(५)** सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) विधेयक,२०२२ - **ॲड राहुल कुल**, **वि.स.स. यांचे.**

**(६)** सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२२ – **श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचे**.

**(७)** सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२२ - **ॲड राहुल कुल**, **वि.स.स. यांचे.**

**(८)** सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२२ - **श्री. प्राजक्त तनपुरे**, **वि.स.स. यांचे.**

**(९)** सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ - महाराष्ट्र परदेशातील रोजगार संरक्षण विधेयक, २०२२ - **डॉ. राहुल वेदप्रकाश पाटील**, **वि.स.स. यांचे.**

अप्रमाणित प्रत

**आठ : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी बॅलटव्दारे काढण्यात आलेल्या अशासकीय ठरावाच्या सूचना (क्रमांक १ ते ३)**

**(१) श्री. नारायण कुचे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २६५**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(२) श्री. किसन कथोरे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २५५**

"राज्यात वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे"

**(३) श्री.अमित देशमुख, वि.स.स. यांचा ठराव क्र. १८३**

"राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

अग्रिम प्रत

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २० जुलै, २०२३

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा